**Publication:** Maharashtra Times (Thane Plus)
**Date:** October 8, 2011

# स्टेट सेल अवेअरनेस डे

स्टेम सेलबद्दल लोकांना अधिकाधिक माहिती व्हावी म्हणून ५ ऑक्टोबर हा दिवस स्टेट सेल अवेअरनेस डे साजरा करण्यात आला. स्टेम सेल बँकिंग आणि थेरपीज उपलब्ध होत आहेत. स्टेम सेल बँकिंग म्हणजे आपल्या जवळच्या व्यक्तींसाठीचा अतिशय सुरक्षित असा बायो-इन्शुरन्स आहे. शिवाय आता हे बँकिंग सर्वसामान्यांना परवडेल अशा किमतीतही उपलब्ध आहे. भारतात दररोज जन्मणाऱ्या जवळपास ३०,००० मुलांपैकी ३० जणांना कोणता ना कोणता विकार जडलेला असतो. अशा रोगांवर उपचार करण्यासाठी स्टेम्स सेलचा मोठा उपयोग होऊ शकतो. आजकाल अनेकांना सांधेदुखीचा रोग जडतो. त्यामध्येही स्टेम सेलचा कसा उपयोग होऊ शकेल यावर अधिक संशोधन चालू आहे तर काही उपचार उपलब्धही आहेत. डॉ. नंदिता पालशेतकर यांनीही स्टेम सेल बँकिंगचा पुरस्कार केला असून या अभिनव पेशींची साठवणूक भविष्यात त्या बाळाला निश्चितपणे उपयोगी ठरेल, असा विश्वास व्यक्त केला.